# कोल्हापूरची हद्दवाढ गरजेची

**कोल्हापूर :** कोल्हापूर शहराचा विकास करायचा असेल तर शहराची हद्दवाढ करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी केले.

येथे झालेल्या कार्यक्रमात फडणवीस म्हणाले की, आम्हाला कोल्हापूरकरांनी दिले आहे. त्यामुळे या सगळ्या नेत्यांना सांगतो, काही काळजी करू नका, यापूर्वीही कोल्हापूरमध्ये कधी कमी पडू दिलं नाही. यापुढेही कमी पडू देणार नाही, पण यात एक गोष्ट नक्की आहे हद्दवाढ करणं फार गरजेचं आहे. हद्दीबाहेरच्या लोकांच्या काही अडचणी आहेत, पण मी लोकप्रतिनिधींना सांगतो, १०० टक्के त्यांच्या अडचणी मी सोडवून देतो, असे आश्वासन त्यांनी दिले.

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, आमदार राजेश क्षीरसागर तसेच कोल्हापूर मनपा महापौर रुपाराणी निकम यांनी कोल्हापूर हद्दवाढीचा मुद्दा उपस्थित केला होता.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन



### फुटबॉलप्रेमींसाठी सुविधा देणार

कोल्हापुरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम उभारण्यासाठी जागा उपलब्ध केली असून बीसीसीआयच्या माध्यमातून आधुनिक स्टेडियम उभारले जाईल. फुटबॉलप्रेमींसाठीही आवश्यक क्रीडा सुविधांवर भर देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### डी. वाय. पाटील यांचे कार्य दिलासादायक

शिक्षण, सहकार, उद्योग आणि सामाजिक क्षेत्रात पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांनी उभे केलेले कार्य सामान्य माणसाला दिलासा देणारे होते. त्यांच्यासारख्या दूरदृष्टीच्या नेत्याचे निधन ही महाराष्ट्राची मोठी हानी असून, त्यांच्या विचारांना आणि कार्याचा वारसा पुढे नेणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. फडणवीस यांनी कोल्हापुरातील पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या 'यशवंत' निवासस्थानी भेट देऊन पाटील कुटुंबीयांचे सांत्वन केले.

**आपल्याला कोल्हापूरला अधिक सुनियोजित करायचंय**

फडणवीस म्हणाले, आज हायकोर्ट आलं, आता त्या हायकोर्टाला शेंडा पार्कला ७५ एकर जागा आपण देत आहोत. त्यामुळे शहरात रोज २० ते २५ हजार लोक येणार त्यामुळे या शहराला अधिक सुनियोजित आपल्याला करायचं आहे. आयटी पार्क, कन्व्हेन्शन सेंटर करत आहोत. त्यामुळे या सगळ्या गोष्टी आपण करत आहोत. त्यामुळे मला विश्वास आहे की पुढच्या काळामध्ये शहराकरिता जो-जो विचार आपण सगळ्यांनी केला असेल, तो टप्याटप्याने पूर्ण करण्यासाठी आम्ही पूर्ण याठिकाणी प्रयत्न करू, हा विश्वास मी आपल्याला देतो, असे ते म्हणाले.

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी कोल्हापूर हद्दवाढीतविरोधात असलेल्या करवीरचे आमदार चंद्रदीप नरके आणि कोल्हापूर दक्षिणचे आमदार अमल महाडिक यांचेही कान टोचले. दोघांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

कोल्हापूरच्या समस्या सोडवण्यासाठी कोल्हापूर मनपाकडून सविस्तर मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना व्यासपीठावरून देण्यात आले.

## 'हर घर तिरंगा' मोहिमेत सहभागी व्हा- पंतप्रधान

**नवी दिल्ली :** भारताचा राष्ट्रध्वज हा देशाचा अभिमान असून देशासाठी नेहमी सर्वोत्तम योगदान देण्यासाठी तो निरंतर प्रेरणेचा स्रोत आहे, असे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी नागरिकांना 'हर घर तिरंगा' मोहिमेत उत्साहाने सहभागी होण्याचे आवाहन केले.

आपला तिरंगा हा आपला अभिमान आहे आणि देशासाठी नेहमी सर्वोत्तम योगदान देण्यासाठी तो प्रेरणेचा निरंतर स्रोत आहे. चला, आपण सर्वांनी 'हर घर तिरंगा' मोहिमेत उत्साहाने सहभागी होऊया आणि 'विकसित भारत' घडवण्यात योगदान देण्याचा आपला सामूहिक संकल्प अधिक दृढ करूया, असे मोदी यांनी एका पोस्टमध्ये म्हटले आहे.

'हर घर तिरंगा' मोहिमेच्या २०२६ च्या आवृत्तीचा प्रारंभ ६ ऑगस्ट रोजी झाला असून ९ ते १७ ऑगस्ट दरम्यान ही मोहीम देशभरात राबवली जाईल. गेल्या चार वर्षांपासून देशात 'हर घर तिरंगा' मोहीम राबवली जात आहे.

# कोट्यवधींच्या उड्डाणपुलाला 'धबधब्याचे' रूप!

- संरक्षण कठडे तोडून पाण्याचा निचरा
- लहान मुलांना मिळतेय 'माळशेज घाट'ची मजा



**नामदेव शेलार/ मुरबाड**

मुरबाड शहरातील नवीन उड्डाणपूल दर्जेदार कामाचे उदाहरण ठरण्याऐवजी सध्या 'जुगाडू' कारभाराचे प्रतीक बनल्याची चर्चा सुरू झाली आहे. पुलावरील पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा करण्यासाठी नियोजन करण्यात अपयश आल्याने आता चक्क पुलाचे संरक्षण कठडे ठिकठिकाणी तोडून पाण्याचा निचरा केला जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे पावसाळ्यात उड्डाणपुलावरून मोठ्या वेगाने पाणी खाली कोसळत असून पुलाला अक्षरशः 'धबधब्याचे' स्वरूप आले आहे.

मुरबाड-कल्याण मार्गावर मुरबाड एसटी स्थानकाजवळ आणि शहराच्या प्रवेशद्वारात हा उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. पुलाच्या दोन्ही बाजूंना पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी प्लास्टिकचे पाइप बसविण्यात आले आहेत. मात्र प्रत्यक्षात हे पाइप अपेक्षित पद्धतीने कार्यरत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्याऐवजी संरक्षण कठडे तोडण्यात आलेल्या ठिकाणांहून पावसाचे पाणी मोठ्या वेगाने खाली कोसळत आहे. पुलाखालून जाणाऱ्या वाहनांवर आणि दुचाकीस्वारांवर अचानक पाणी पडत असल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.

मुरबाड शहरात नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांत पाणी साचले होते. जुना पेट्रोल पंप, म्हसा रोड यांसह विविध ठिकाणी पाणी साचून वाहतूक विस्कळीत झाली होती.

### घाटमार्गावरील कामाच्या दर्जावरही प्रश्नचिन्ह

माळशेज घाटातील नव्याने तयार करण्यात आलेला काँक्रीट रस्ता काही ठिकाणी खचल्याने राष्ट्रीय महामार्गावरील कामाच्या दर्जावर यापूर्वीच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. त्यानंतर मुरबाड शहरातील हा उड्डाणपूलही काही काळ वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला होता. आता पुलावरील पाणी निचऱ्याची 'जुगाडू' व्यवस्था समोर आल्याने कामाच्या गुणवत्तेबाबत नागरिकांचा संशय अधिकच वाढला आहे.

# 'वैचारिक प्रदूषणामुळेच पर्यावरणाचा ऱ्हास'

**लातूर :** वैचारिक प्रदूषण हेच सर्व प्रकारच्या पर्यावरणाच्या ऱ्हासाच्या मुळाशी आहे. नागरी जागरूकतेचा अभाव, निसर्गाविषयी कमी होत चाललेली संवेदनशीलता आणि सामाजिक व राजकीय निष्क्रियतेमुळे पर्यावरणीय हानी सातत्याने वाढत आहे, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्या. अभय ओक यांनी केले आहे.

लातूरच्या दयानंद कायदा महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना माजी न्यायमूर्ती म्हणाले की, नागरिकांनी प्रदूषणमुक्त वातावरणात जगण्याचा घटनात्मक अधिकार आहे, परंतु कायद्याचे पालन करण्याबाबतच्या व्यापक उदासीनतेमुळे समाजाला अजूनही प्रदूषणाचा सामना करावा लागत आहे.

पर्यावरणाचा ऱ्हास कमी करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे.

गणेशोत्सवादरम्यान डीजे फटाके आणि बॅनर्सचा होणारा अतिवापर यावर प्रश्न उपस्थित करत ते म्हणाले, ज्या गणेशाला बुद्धीची देवता मानले जाते, त्यांच्याच उत्सवात अशा प्रकारच्या प्रथा पाळण्यात कसले शहाणपण आहे? असा प्रश्न त्यांनी केला.

## मी पंतप्रधान असेपर्यंत पॅलेस्टाईन अशक्य-नेत्यनाहू

**तेल अवीव :** इस्रायलने अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची गाझाबाबतची १५ मुद्द्यांची योजना फेटाळली आहे. मी पंतप्रधान असेपर्यंत कोणतेही पॅलेस्टिनी राष्ट्र अस्तित्वात येणार नाही,असा निर्धार पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी केला आहे.

# कोटक बँकेकडून हायब्रिड गृहकर्ज योजना जारी

### ग्राहकांना ६५ महिन्यांपर्यंत व्याजदराची खात्री

**नवी दिल्ली :** गृहकर्ज घेणाऱ्या ग्राहकांना सर्वात मोठा ताप असतो, तो ईएमआय वाढण्याचा. रिझर्व्ह बँकेने रेपो दरात वाढ केल्यास त्यांच्या ईएमआयमध्ये लगेच वाढ होते. त्यामुळे त्यांचे महिन्याचे गणित बिघडते. आता कोटक महिंद्रा बँकेने आपल्या 'हायब्रिड गृहकर्ज' योजनेची घोषणा केली आहे. या योजनेत ग्राहकांना त्यांच्या गृहकर्जाचा व्याजदर ६५ महिन्यांपर्यंत 'स्थिर' ठेवता येणार आहे.

ग्राहकांना नेमका किती 'ईएमआय' भरावा लागणार आहे हे कळल्यास त्यांचे नियोजन चांगले होते. या योजनेत ग्राहकांना ३९, ५२ किंवा ६५ महिन्यांचा फिक्स्ड-रेट (स्थिर व्याजदर) कालावधी निवडता येतो. या कालावधीत रिझर्व्ह बँकेचा रेपो रेट बदलला तरी ग्राहकाचा व्याजदर आणि ईएमआय बदलणार नाही. ग्राहकाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर हे कर्ज 'फ्लोटिंग-रेट' रचनेत जाते, जे मंजुरीच्या वेळी जाहीर केलेल्या पूर्व-निर्धारित स्प्रेडसह रेपो रेटशी जोडलेले असेल.

कोटक महिंद्रा बँकेचे प्रमुख (मॉर्टगेज) नकुल सक्सेना म्हणाले, 'गृहकर्ज हे काही दशकांचे असते. या काळात व्याजदराचे अनेक चढ-उतार पाहायला मिळतात. अनेक कर्जदारांसाठी, प्रत्येक वेळी व्याजदराचा आढावा घेतला की, पुढील बदलाचा त्यांच्या ईएमआयवर किंवा बजेटवर काय परिणाम होईल असा प्रश्न निर्माण होतो.

भविष्यात व्याजदर वाढले, तर १ कोटी रुपयांच्या गृहकर्जावर कर्जदार ३.४६ लाख रुपयांपर्यंतची बचत करू शकतो, असे बँकेने सांगितले.

# ईडीकडून अनिल अंबानी समूह कंपन्यांविरोधात आरोपपत्र दाखल

**नवी दिल्ली :** रिलायन्स अनिल अंबानी समूहाच्या कंपन्या आणि माजी अधिकाऱ्यांशी संबंधित दोन वेगवेगळ्या मनी लॉन्ड्रिंग प्रकरणांमध्ये आरोपपत्र दाखल केले आहे, असे अंमलबजावणी महासंचालनालयाने रविवारी सांगितले.

द्वारका येथील पीएमएलए न्यायालयासमोर रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, रिलायन्स समूहाचे माजी अधिकारी सतीश सेठ आणि इतरांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले. रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेडच्या संदर्भातील असून, या प्रकरणात 'ईडी'ने राऊस ॲव्हेन्यू येथील विशेष न्यायालयात पुरवणी आरोपपत्र दाखल केले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपपत्र ईडीने दाखल केले होते. पीएमएलए अंतर्गत दाखल करण्यात आलेल्या या तक्रारीत आरकॉम, रिलायन्स टेलिकॉम लिमिटेड, 'राग'चे माजी अधिकारी सतीश सेठ आदींना नामांकित केले.

# भारतीय आणि अमेरिकन नौदलाचा संयुक्त सराव

**नवी दिल्ली :** भारत आणि अमेरिकेच्या नौदलांमधील परस्पर सहकार्य वाढवणे आणि दोन्ही बाजूंच्या विशेष डायव्हिंग आणि स्फोटक शोध व निष्फळ करणाऱ्या (ईओडी) पथकांमधील व्यावसायिक सहकार्य मजबूत करणे या उद्देशाने १० ते १४ ऑगस्ट दरम्यान कोची येथे सराव आयोजित केला जाणार आहे, अशी माहिती नौदल अधिकाऱ्यांनी रविवारी दिली आहे.


## मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. १
(भारत सरकार, वित्त मंत्रालय)
२ रा मजला, एमटीएनएल इमारत, कुलाबा मार्केट, कुलाबा-४०० ००५.
**मूळ अर्ज क्र. १६ सन २०१४**

परि क्र: ९४
पुढील दिनांक: ११.०९.२०२६

**पंजाब नॅशनल बँक** ... अर्जदार / प्रमाणपत्र धारक
विरूध्द
**मे. सुपरस्टार मल्टीट्रेड प्रा. लि. आणि इतर** ... प्रतिवादी / प्रमाणपत्र देणीदार

**विक्री उद्घोषणा मांडण्याकरिता सूचना**

ज्याअर्थी, मा. पीठासीन अधिकाऱ्यांनी **मूळ अर्ज क्र. १५१ सन २०१२** मध्ये मूळ अर्जदार बँक / प्रमाणपत्र धारकास **रु. ४,७६,७२,१२८.९० (रुपये चार कोटी श्याहत्तर लाख बहात्तर हजार एकशे अठ्ठावीस आणि नव्वद पैसे मात्र )** ही रक्कम व्याज व खर्चासह अदा करण्यासाठी वसुली प्रमाणपत्र जारी केले आहे. ज्याअर्थी, आपण सदर रक्कम अदा केलेली नाही आणि अधोहस्ताक्षरीने खाली नमूद केलेली मिळकत जप्त करून तिच्या विक्रीचा आदेश दिला आहे.

तुम्हाला याद्वारे कळविण्यात येते की विक्रीची उद्घोषणा काढणे आणि तिच्या अटी मांडण्याकरिता दिनांक **२४.०८.२०२६ रोजी दुपारी २.३० वाजता** निश्चित करण्यात आली आहे. तुम्हाला उद्घोषणा मांडणीमध्ये सहभागी होण्याकरिता आणि सदर मिळकत किंवा तिच्या कोणत्याही भागाशी संबंधित कोणताही बोजा, प्रभार, दावे किंवा दायित्वे निम्नस्वाक्षरीकारांना कळविण्यासाठी याद्वारे बोलाविण्यात येत आहे.

**स्थावर मिळकतीचे परिशिष्ट**

तळमजल्यावरील फ्लॅट क्र. १/सी, बिल्डिंग क्र. ४, कामना सीएचएसएल., एस. के. भोले रोड, सिद्धिविनायक मंदिराजवळ, प्रभादेवी, मुंबई.
सदर येथे **०५ ऑगस्ट,२०२६** रोजी माझ्या हस्ते आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्यासह दिले.

शिक्का
सही/-
**(यतींद्र कुमार सिन्हा)**
वसुली अधिकारी,
कर्ज वसुली न्यायाधिकरण

**सीडी क्र. १** मे. सुपर स्टार मल्टीट्रेड प्रा. लि.पत्ता :- वर्ल्ड ट्रेड सेंटर, ३०वा मजला, कफ परेड, मुंबई- ४०० ००५.
**सीडी क्र.२ श्री. ललित के. पोद्दार,** १५०३-ए, सुभदा टॉवर्स, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई-४०००१८
**सीडी क्र. ३ श्री. रवी एल. पोद्दार,** १५०३-ए, सुभदा टॉवर्स, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई-४०००१८
**सीडी क्र. ४ धनवंती सी. म्यात्रावर,** फ्लॅट क्र. ११सी, बिल्डिंग क्र. ४, कामना सीएचएस., प्रभादेवी, मुंबई-४०० ०२८.

**तसेच प्रति :**
१. संबंधित सोसायटी
२. बीएमसी प्राधिकरण / स्थानिक नागरी संस्था / तलाठी
३. संबंधित दुय्यम निबंधक - सीएच बँकेने नियमानुसार वरील नमूद मिळकतीवरील भार संबंधित दुय्यम निबंधकाच्या अभिलेखात नोंदवून घ्यावा.

## जाहीर सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की, आम्ही तळ आणि पहिल्या मजल्यावर असलेल्या **इंडस्ट्रियल युनिट क्र. एल-५** च्या मालकीहक्काची चौकशी करीत आहोत, ज्याचे क्षेत्रफळ ३०,००० चौ. फूट चटई क्षेत्र (म्हणजेच तळमजल्यावरील १५,००० चौरस फूट बांधकाम क्षेत्र आणि पहिल्या मजल्यावरील १५,००० चौरस फूट बांधकाम क्षेत्र) असून, त्यासोबत २० फूट मार्जिन स्पेस आणि संलग्न खुली भिंत, जी **''श्री राजलक्ष्मी टेक्सटाईल पार्क''** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमध्ये बांधलेली आहे, जी सर्व्हे क्र. ८१/३ (भाग) आणि सर्व्हे क्र. ९१/१-ए (भाग), गाव पोगाव, तालुका भिवंडी, जी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, जिल्हा ठाणे-४२१३०२ यांच्या हद्दीत तसेच भिवंडी नोंदणी जिल्हा ठाणे आणि नोंदणी उपजिल्ह्याच्या हद्दीत आहे (यापुढे ''सदर मिळकत'' असा उल्लेख), जी सध्या **मे. राम इंटरनॅशनल** यांच्या ताब्यात आणि कब्जात आहे.

उपरोक्त सदर मिळकतीच्या मूळ मालकीहक्काबाबत आणि/ किंवा त्यावर कोणताही दावा/किंवा हक्क असलेल्या सर्व व्यक्तींनी, वारसा, हिस्सा, विक्री, गहाण, भाडेपट्टा, धारणाधिकार, परवाना, भेट, कब्जा, अदलाबदल, भार, प्रलंबित दावा, देखभाल, सुखाधिकार, न्यायालयीन आदेश किंवा भार किंवा अन्य कोणत्याही प्रकारे असल्यास, अशा दाव्याचे समर्थन करणाऱ्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रतींसह, या सूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून ७ (सात) दिवसांच्या आत अधोहस्ताक्षरी यांना त्यांच्या खाली नमूद केलेल्या पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा, अशा व्यक्तींचे दावे, असल्यास, त्याग केलेले आणि सोडून दिलेले मानले जातील आणि त्यानंतर कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही.

दिनांक: १०.०८.२०२६
स्थळ: मुंबई

सही/-
**श्री. रविंद्र कुमार यादव**
**वकिल, उच्च न्यायालय.**
**द्वारा, गिरिश पी. जैन अँड कं.,**
**१०१-१०२, पीस हेवन, एन. एम. काळे मार्ग, गोखले रोड (दक्षिण) समोर, दादर (पश्चिम), मुंबई - ४०००२८.**

## PUBLIC NOTICE

This is to inform General Public at large that my clients intend to purchase and acquire Flat more particularly described in the Schedule hereunder written from **Mr. Anil Sahadev Salian and Mrs. Sunila Anil Salian** free from all encumbrances. The Vendors have informed that the below mentioned Flat is encumbered with Axis Bank.

Any person/s having or Claiming any right, title, demand or interest whatsoever into or upon or in respect of said Flat described in the Schedule in any respect, by way of Sale, Exchange, Lease, License, Trust, Inheritance, Legal Heirs, Possession, Attachment, Gift, Lease Pendense, Lien, Interest, Charge, Mortgage (save and except Axis Bank), Lease, Deed or otherwise howsoever are hereby required to make the same known in writing to the undersigned within 15 days from the date of publication hereof, with documents in support of his/her/their claims/objections. If no claims/objections are received within the above stipulated period shall be considered and treated as deliberately/voluntarily abandoned, waived and given up all their rights and thereafter no claims or objections shall be taken in consideration.

**SCHEDULE OF FLAT**

**Flat No. 2304, admeasuring 452 sq.ft. carpet area i.e. equivalent to 42 sq.mtrs carpet area**, situated on the 23rd floor in the A wing of building known as "**Marina Enclave" of the "Marina Enclave A B Co-operative Housing Society Limited" lying, being and situate at land bearing Survey No. 44, Hissa No. 1, 90 Feet, D.P. Road, Malad (West), Mumbai – 400095** laying on land bearing **C.T.S No. 507, Village Malvani, Taluka Borivali, Mumbai Suburban District** along with Share Certificate No. 075 dated 1st day of April, 2022 holding 10 (ten) fully paid-up shares of Rs.50/- (Rupees Fifty) each, bearing distinctive Nos. 741 to 750 (both inclusive) issued by the Society along with One Open Car Parking Space No. 65 in the said Building.

Date: 10/08/2026
Place: Mumbai

**Vinay H. Bhatia**
**Advocate**
**Legal Draftsmen**
**Office No. 203, Shree Prasad House, 2nd Floor, 35th Road, Bandra (West), Mumbai- 400050.**

## सार्वजनिक सूचना

सर्व संबंधित नागरिक, सभासद, जमीनधारक व विकासक यांना याद्वारे कळविण्यात येते की, सिद्धिविनायक असोसिएट यांच्या वतीने गावठाण मालमत्ती संदर्भातील स्टॅम्प ड्युटी, नोंदणी शुल्क किंवा कोणत्याही प्रकारची इतर रक्कम कोणत्याही विकासकाकडून, व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून गोळा केली जात नाही. तरी, जर कोणी व्यक्ती स्वतःला सिद्धिविनायक असोसिएट यांचा प्रतिनिधी, एजंट किंवा अधिकृत व्यक्ती असल्याचे सांगून स्टॅम्प ड्युटी अथवा इतर कोणतीही रक्कम स्वीकारत असेल, तर अशा व्यक्तीस कोणतीही रक्कम देऊ नये.

जर कोणत्याही व्यक्तीने स्वतःच्या जबाबदारीवर अशा प्रकारे कोणालाही रक्कम अदा केली, तर त्यातून होणाऱ्या कोणत्याही आर्थिक नुकसानीस, फसवणुकीस अथवा कायदेशीर परिणामांस सिद्धिविनायक असोसिएट कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

ही सूचना सर्वांच्या माहितीसाठी व हितार्थ प्रसिद्ध करण्यात येत आहे

**दिनांक : १० ऑगस्ट २०२६**
**स्थळ : नवी मुंबई**

**सिद्धिविनायक असोसिएट**
कार्यालय क्र. ४११ आणि ४१२, ४ था मजला,
अलोरा ओलियराईज, प्लॉट क्र. A-786,
टीटीसी (TTC) औद्योगिक क्षेत्र, खैरणे,
नवी मुंबई ४०० ७०९, तालुका व जिल्हा ठाणे.
**संपर्क तपशील :** ९८९२८०९३२८ / ९८९२८२६६२८

## कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. २, मुंबई मध्ये

३रा मजला, टेलिफोन भवन, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई-४००००५.
**अंतरिम अर्ज क्र. २३८ सन २०२६**
**मध्ये** निशाणी क्र. ११
**मूळ अर्ज क्र. १८० सन २०१३**

**पंजाब नॅशनल बँक** ....अर्जदार
**(पूर्वीची युनायटेड बँक ऑफ इंडिया)**
विरुद्ध
**मे. साई ज्वेल्स प्रा. लि. आणि इतर.** ....प्रतिवादी

**सूचना**

ज्याअर्थी, **ओ.ए. क्र. १८० सन २०१३** हा मा. पीठासीन अधिकारी, डीआरटी-२, मुंबई यांच्यासमोर दिनांक **२३.०१.२०२६** रोजी सूचीबद्ध करण्यात आला होता. त्यावेळी अर्जदाराने युनायटेड बँक ऑफ इंडियाचे पंजाब नॅशनल बँकेमध्ये विलीनीकरण झाल्यामुळे या मूळ अर्जामध्ये सुधारणा करण्याची या न्यायाधिकरणाची परवानगी मागण्यासाठी **आय. ए. क्र. २३८ सन २०२६** सादर केला आहे.

ज्याअर्थी, अर्जदाराने सदर **आय. ए. क्र. ९२४ सन २०२१** प्रतिवादीस स्पीड पोस्ट /आरपीएडीद्वारे बजावण्याचा प्रयत्न केला होता, परंतु ते **''सोडून गेले''** या टपाल शेरासह दिनांक **१२.०१.२०२६** रोजी परत आले असून सेवा प्रतिज्ञापत्र **(निशाणी क्र. ९)** द्वारे विधिवत अभिलेखावर ठेवण्यात आले आहे.

ज्याअर्थी, अर्जदाराने दिनांक **२३.०१.२०२६** रोजी मा. पीठासीन अधिकारी, डीआरटी-२, मुंबई यांच्यासमोर आय.ए. क्र. **२३८ सन २०२६** सादर केला आणि स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये, म्हणजेच दैनिक फ्री प्रेस जर्नल (इंग्रजी) आणि नवशक्ती (मराठी) मध्ये सूचना प्रसिद्ध करून प्रतिवादीस बजावण्यासाठी वेळ मागितला. ज्यास न्यायाधिकरणाने परवानगी दिली आहे.

म्हणून, आपणास याद्वारे **२६.११.२०२६** रोजी **स. ११.०० वा.** या **रजिस्ट्रार, डीआरटी-२, मुंबई** यांच्यासमोर आपल्या केसचा बचाव करण्यासाठी वैयक्तिकरित्या किंवा वकिलाद्वारे उपस्थित राहणे आवश्यक आहे, अन्यथा या प्रकरणात योग्य आदेश दिला जाऊ शकतो.

माझ्या हस्ते आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या **२६ फेब्रुवारी, २०२६** रोजी दिले.

SEAL
सही/-
**प्रभारी, रजिस्ट्रार**
**कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. २, मुंबई**

**सर्व प्रतिवादींची नावे आणि पत्ते**
१. **मे. वरुण ज्वेल्स प्रा. लि.,** कंपनी अधिनियम १९५६ च्या नियमानुसार एक कंपनी, जिचे नोंदणीकृत कार्यालय येथे आहे. १२, शंकेश्वर दर्शन, ए. जी. पवार क्रॉस लेन, भायखळा (पूर्व), मुंबई-४०० ०२७.
२. **मे. वरुण ज्वेल्स प्रा. लि.,** १३, शंकेश्वर दर्शन, ए. जी. पवार क्रॉस लेन, भायखळा (पूर्व), मुंबई-४०० ०२७.
३. **श्री. किरण एन. मेहता,** १२, शंकेश्वर दर्शन, ए. जी. पवार क्रॉस लेन, भायखळा (पूर्व), मुंबई-४०० ०२७.
४. **श्री. कैलाश एस. अगरवाल,** १२, शंकेश्वर दर्शन, ए. जी. पवार क्रॉस लेन, भायखळा (पूर्व), मुंबई-४०० ०२७.

## जाहीर सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की, माझ्या व्यवसायातील भागीदार **सुश्री छाया बाबुलाल कोठारी यांचे दिनांक १६.०४.२०२२ रोजी निधन झाले.** त्यांच्या नोंदणीकृत मृत्युपत्रानुसार, मी, **नीता रेशमिया**, त्यांच्या सर्व जंगम व स्थावर मिळकतींची विधिवत नियुक्त मृत्युपत्र निष्पादक आणि एकमेव लाभार्थी आहे. तसेच, सुश्री छाया बाबुलाल कोठारी यांनी त्यांच्या कारच्या नोंदणी अभिलेखामध्ये माझे नाव नामनिर्देशित केले होते. प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) यांनी सर्व दस्तऐवजांची पडताळणी करून सदर कार माझ्या नावावर हस्तांतरित करण्यास परवानगी दिली आहे. वाहनाचा तपशील खालीलप्रमाणे आहे: मेक/ मॉडेल: मारुती विटारा ब्रेझा व्हीडीआय एएमटी **नोंदणी क्र.: एमएच४७एएन२०४७** सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही व्यक्तीची हरकत असल्यास, अशा व्यक्तीने या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत अधोहस्ताक्षरीतांना लेखी स्वरूपात कळवावे, अन्यथा कोणताही पुढील संदर्भ न घेता हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

सही/-
नीता रेशमिया
दिवंगत श्रीमती छाया बाबुलाल कोठारी यांच्या मृत्युपत्राअंतर्गत
मृत्युपत्र निष्पादक आणि लाभार्थी

## अल्केमिस्ट ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लि.

(अल्केमिस्ट XXV ट्रस्टचे ट्रस्टी)
ए-२७० (पहिला मजला व दुसरा मजला), डिफेन्स कॉलनी, नवी दिल्ली-११० ०२४, दूरध्वनी: ९१-११-४६५६२५८० - ८३
फॅक्स: ९१-११-४६५६२५८४, ईमेल: admin@alchemistarc.com, वेब: www.alchemistarc.com

### लिलाव विक्री सूचना

(कृपया सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ चा नियम ८(६) व नियम ९, परिशिष्ट IV A पहा)

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (यापुढे ''सरफेसी कायदा, २००२'' असे संदर्भित) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ चा नियम ८(६) व नियम ९ अन्वये स्थावर तारण मत्तेच्या (यापुढे ''तारण मत्ता'' असे संदर्भित) विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना**

सर्वसामान्य जनतेस आणि विशेषतः **एमएमएस क्रिएशन्स प्रायव्हेट लिमिटेड (यापुढे ''कर्जदार कंपनी'' असे संदर्भित)** यांच्या कर्ज खात्यातील कर्जदार/प्रवर्तक/गहाणदार/हमीदार यांना सूचना देण्यात येते की, खाली वर्णन केलेली तारण मत्ता, जी मूळ धनको, बँक ऑफ इंडिया (अभिहस्तांकनकर्ता) यांच्याकडे गहाण ठेवण्यात आली होती; ज्यांनी त्यानंतर **१०.०१.२०१४** च्या अभिहस्तांकन कराराद्वारे सरफेसी कायदा, २००२ व संलग्न कायद्यांतील संबंधित तरतुदींनुसार अल्केमिस्ट XXV ट्रस्टचे विश्वस्त म्हणून कार्य करणाऱ्या अल्केमिस्ट ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड **(एएआरसी) (यापुढे ''तारण धनको'' असे संदर्भित)** यांच्या नावे तिचे हक्क, नामाधिकार आणि हितसंबंध हस्तांतरित केले; जिचा अन्वयिक/सांकेतिक कब्जा एएआरसीने सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३(४) च्या तरतुदींनुसार दिनांक २३.१२.२०१९ रोजी घेतला होता; ती डीआरटी-२, दिल्ली यांच्यासमक्ष ओए/२४९/२०१५ मधील १९.०१.२०१७ रोजी जारी केलेल्या वसुली प्रमाणपत्र क्र. १८/२०१७ नुसार पुढील व्याज व इतर प्रभारासह २७.०५.२०१५ रोजीस गणना केल्यानुसार रु. १३,६३,५९,७७६/- (रुपये तेरा कोटी त्रेसष्ट लाख एकोणसाठ हजार सातशे शहात्तर मात्र)च्या वसुलीकरिता जे **कर्जदार, एमएमएस क्रिएशन्स प्रा. लि. आणि हमीदार, सुश्री. मंजू मोदी, श्री. राम चंद तिवारी आणि श्री. राकेश सत्यानारायण पांडे** यांच्याकडून तारण धनकोस देय असलेलया रकमेच्या वसुलीसाठी **१४.०९.२०२६** रोजी **''जे आहे जसे आहे'', ''जे आहे तसे आहे'', ''जे काही आहे'' आणि ''कोणत्याही आधाराशिवाय''** या तत्त्वावर ई-लिलावाद्वारे विकली जाईल. खाली नमूद केलेली तारण मत्ता ई-लिलाव एजन्सी, सी१ इंडिया प्रा. लि. यांच्यामार्फत त्यांच्या संकेतस्थळ/पोर्टल म्हणजेच **https://www.bankeauctions.com** वर खाली नमूद केलेल्या तारीख व वेळी ''ऑनलाईन ई-लिलाव'' पद्धतीने विकली जाईल आणि ई-लिलाव बंद होण्यापूर्वी वाढीव बोली लावल्यास प्रत्येक वेळी पाच (५) मिनिटांची अमर्यादित स्वयंचलित मुदतवाढ दिली जाईल

**तारण मत्तेचे वर्णन**

| अनु. क्र. | तारण मत्ता | तपशील |
|---|---|---|
| १. | सर्व्हे क्र. २९, हिस्सा क्र. ३/३, गाव धानीव, नालासोपारा, तालुका वसई, जि. ठाणे, महाराष्ट्र येथील मे. एमएमएस क्रिएशन्स प्रा. लि. यांच्या नावावरील, क्षेत्र मोजमापीत ५३०० चौ. मीटर (०-५३-०-एच.आर. मुल्यांकन १.०० पैसे) (५७०४८.७३ चौ. फूट) (५३ गुंठे) समन्वय: १९.४३६०६४, ७२.८६१७८२ | ई-लिलावाची तारीख: **१४/०९/२०२६**<br>ई-लिलावाची वेळ: स. ११:३० वा. ते दु. १२:३० वा.<br>राखीव किंमत: **रु. ९,५४,००,०००/-**<br>इसारा अनामत रक्कम (ईएमडी): **रु. ९५,४०,०००/-**<br>बोली वाढ: **रु. १०,००,०००/-** |

**विक्री अधोस्वाक्षरीकाराद्वारे वेब पोर्टल https://www.bankeauctions.com येथे उपलब्ध करून दिलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे केली जाईल.**

सर्व इच्छुक पक्षांचे लक्ष सरफेसी कायदा, २००२ च्या कलम १३ च्या उप-कलम (८) मधील, कर्जदार/हमीदार/गहाणदार इत्यादींना तारण मत्ता विमोचित करण्यासाठी उपलब्ध वेळेसंबंधीच्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे. कर्जदार/प्रवर्तक/गहाणदार/हमीदार यांनी ही सूचना, लागू असल्याप्रमाणे, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८(६) नुसार ३० दिवसांची विक्री सूचना म्हणूनही ग्राह्य धरावी आणि त्यांना याद्वारे **०९/०९/२०२६** रोजी किंवा त्यापूर्वी संपूर्ण देयता फेडण्याची अंतिम व शेवटची संधी देण्यात येत आहे, असे करण्यात अयशस्वी झाल्यास तारण मत्ता या विक्री सूचनेनुसार आणि खाली दिलेल्या लिंकवर प्रकाशित केलेल्या विक्रीच्या अटी व शर्तीनुसार विकली जाईल. बोजाबाबत, बोलीदारांना बोली दस्तऐवज पाहण्याचा सल्ला देण्यात येत आहे. दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ च्या कलम २९ए नुसार अशी व्यक्ती, किंवा अशा व्यक्तीसोबत संयुक्तपणे अथवा संगनमताने कार्य करणारी अन्य कोणतीही व्यक्ती अपात्र असल्यास, त्या व्यक्तीस बोली सादर करण्याचा अधिकार राहणार नाही आणि सर्व बोलीदारांनी त्यांच्या सर्व केवायसीसह नोटरीकृत हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील, ज्यामध्ये बोलीदाराचे कर्जदार/प्रवर्तक/हमीदार/गहाणदार यांच्याशी कोणत्याही प्रकारचे संबंध (व्यावसायिक/वैयक्तिक) नाहीत, असे घोषित व पुष्टी करण्यात येईल (मसुदा बोली दस्तऐवजात दिलेला आहे). लिलाव विक्रीमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक असलेल्या कोणत्याही बोलीदाराने तारण धनकोच्या ए-२७०, पहिला व दुसरा मजला, डिफेन्स कॉलनी, नवी दिल्ली-११००२४ येथील कार्यालयातून बोली दस्तऐवज प्राप्त करणे आवश्यक राहील किंवा कामकाजाच्या दिवशी दिनांक **१०/०८/२०२६ ते १०/०९/२०२६ दरम्यान स. १०:३० ते सायं. ५:३०** या वेळेत एओकडे ईमेलद्वारे विनंती करून तो प्राप्त करता येईल किंवा खालील लिंकवरून डाउनलोड करता येईल. ''तारण मत्तेची सीमांकन करण्यात आलेली आहे परंतु कुंपण घालण्यात आलेले नाही आणि ती एएआरसीच्या प्रत्यक्ष कब्जातही नाही''. कोणतीही व्यक्ती/बोलीदार **१०/०८/२०२६ ते १३/०९/२०२६** या कालावधीत तारण मत्तेची पाहणी करू शकतात. बोलीदाराने विधिवत निष्पादित केलेला बोली अर्ज, हमीपत्र, घोषणापत्र, ईएमडी तपशील व केवायसी वेब पोर्टल: https://www.bankeauctions.com वर अपलोड करावे आणि मूळ बोली अर्ज, हमीपत्र, घोषणापत्र, ईएमडी तपशील व केवायसी दिनांक **११/०९/२०२६ रोजी सायं. ५:०० वा.** पर्यंत किंवा त्यापूर्वी एओकडे सादर करावे. हे सरफेसी कायदा, २००२ आणि/किंवा अन्य कोणत्याही कायद्यानुसार तारण धनकोस उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही हक्कांना बाधा न आणता आहे. अल्केमिस्ट XXV ट्रस्ट हा सिक्युरिटायझेशन ट्रस्ट असल्यामुळे, सीबीडीटी अधिसूचना क्र. ४६/२०१६ एफ. क्र. २७५/१६/२०१६- आयटी (बी), दिनांक १७-०६-२०१६ नुसार टीडीएससाठी जबाबदार नाही. खरेदीदाराने/खरेदीदारांनी बोलीच्या रकमेव्यतिरिक्त, बोलीच्या रकमेवर लागू दराने लागू जीएसटी तारण धनकोस भरावा लागेल आणि भविष्यात कोणत्याही प्राधिकरणाने भरलेला जीएसटी देय रकमेपेक्षा कमी असल्याचे ठरविल्यास, अशा खरेदीदाराची/बोलीदाराची कमतरतेची जीएसटी रक्कम, दंड इत्यादी असल्यास, भरण्याची संपूर्ण जबाबदारी व दायित्व राहील.

ही विक्री या लिलाव विक्री सूचनेमध्ये समाविष्ट केलेल्या अटी आणि खाली नमूद केलेल्या **लिंकवर** प्रकाशित केलेल्या विक्रीच्या अटी व शर्तीच्या काटेकोरपणे अधीन आहे. विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया **लिंक** (**लिंक** www.alchemistarc.com आणि ASSETS टॅब अंतर्गत LIVE AUCTION टॅबवर क्लिक करा) येथे भेट द्या. कोणत्याही स्पष्टीकरणासाठी/माहितीसाठी, इच्छुक पक्ष एओशी दूरध्वनी क्रमांक- ०११- ४६५६२५८०-८१-८२-८३ वर किंवा admin@alchemistarc.com या ईमेलवर संपर्क साधू शकतात.

**ठिकाण: नवी दिल्ली, दिनांक: १०/०८/२०२६** **सही/- (प्राधिकृत अधिकारी)**

## MAHAGENCO E-TENDER NOTICE

Maharashtra State Power Generation Co. Ltd.
Tel.No.- 022-69425000/5005

**Tender Specification No. CE(C)-I/Koradi/Temporary Connection line/RLY/T- 659 /RFX.3000070510/ 2026-27.**

**NAME OF WORK: TEMPORARY CONNECTIONS FROM 3 X660 MW RAILWAY YARD TO RLY.LINES OF WAGON TIPPLER 3 &4 OF 210MW TPS DURING CONSTRUCTION OF PROPOSED BROAD GAUGE RAILWAY SIDING FOR 2X660 MW REPLACEMENT PROJECT KORADI DIST. NAGPUR.**

| | |
|---|---|
| **Issue Date: 10.08.2026 to 30.08.2026 Up to 18:00 hrs.** | **Time Limit: 3 (Three months) (including Monsoon Period)** |
| **Tender Fee: Rs 5900/-** (Rs. Five Thousand Nine Hundred only) (Including **GST 18 %**) | **Last date of Submission :- 31.08.2026 Upto 17.00 hrs.** |
| **Estimated cost :- Rs. 5,58,10,191.86/-** | **E.M.D. Rs. 5,58,102/- (By E-Payment only)** |

**Contact Person:- Chief Engineer(Civil)-I, MSPGCL, Estrella Batteries Expn Bldg., Plot No.1,Matunga, Mumbai-19. Tel.No. 022-69425000/5005.**
**For further details visit our Website: https://eprocurement.mahagenco.in**
**Agencies are requested to register themselves for future ETenders**

## सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

सारस्वत बँक
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (शेड्युल्ड बँक)

**केंद्रीकृत वसुली विभाग**
६वा मजला, हिल टॉप बिल्डिंग, अविनाश व्ही. नागवेकर मार्ग, सिध्दीविनायक होरायझन बिल्डिंग जवळ, प्रभादेवी, मुंबई- ४०० ०२५.
**दूरध्वनी क्र.: ८६५७०४३७१३-७१५, ८८२८८०५६०९**

### ताबा सूचना

**[ सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ च्या नियम ८(१) अन्वये ]**

**ज्याअर्थी** निम्नस्वाक्षरीकारांनी **सारस्वत को-ऑप. बँक लि.** चे **प्राधिकृत अधिकारी** म्हणून दि सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४ सन २००२) अन्वये आणि कलम १३ (१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून **कर्जदार/गहाणवटदार: मे. छगन ज्वेलर्स, मालक अनिता उत्तम प्रजापती, हमीदार आणि गहाणवटदार: श्री. उत्तमकुमार छोगालाल प्रजापती आणि तेजपाल छोगालाल प्रजापती आणि हमीदार: श्रीम. मोनालिसा तेजपाल प्रजापती** यांना सूचनेमध्ये नमूद केलेली **रु. १९,१३,९२२/-** (रुपये एकोणीस लाख तेरा हजार नऊशे बावीस मात्र) **३१.०१.२०२३ रोजीस** अधिक त्यावरील व्याज ही रक्कम सदरहू सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून **६० दिवसांच्या आत** चुकती करण्यासाठी दिनांक **०६.०२.२०२३ रोजी मागणी सूचना निर्गमित केलेली होती.**

हमीदार/गहाणवटदार यांनी रक्कम चुकती करण्यामध्ये कसूर केलेली आहे म्हणून कर्जदार/ हमीदार/गहाणवटदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकर्त्यांनी **०६.०८.२०२६** रोजी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ सहवाचता अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट कलम (४) अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील वर्णन केलेल्या मिळकतीचा **प्रत्यक्ष ताबा** घेतलेला आहे.

**विशेषत: कर्जदार/हमीदार/गहाणवटदार आणि सर्वसामान्य जनता यांना याद्वारे सावधान करण्यात येते की, त्यांनी मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करू नये आणि मिळकतीवरील कोणताही व्यवहार हा सारस्वत को-ऑप. बँक लि. च्या रु. १९,१३,९२२/- (रुपये एकोणीस लाख तेरा हजार नऊशे बावीस मात्र) ३१.०१.२०२३ रोजीस आणि त्यावरील व्याजाच्या अधीन राहील.**

कर्जदार/हमीदार/गहाणवटदारांचे लक्ष तारण मत्ता विमोचित करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात अधिनियमाच्या कलम १३ च्या पोटकलम (८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

**स्थावर मिळकतीचे वर्णन**

**फ्लॅट क्र. ५०१,** शिवधाम कॉम्प्लेक्स मधील **त्रिनेत्र सीएचएसएल अशा ज्ञात सोसायटीमध्ये** त्रिनेत्र अशा ज्ञात इमारतीमधील ए विंग मधील ५व्या मजल्यावर मोजमापित सुमारे १०७४ चौ. फू. बिल्ट अप, प्लॉट क्र. २, सिटी सर्व्हे क्र. ४८३९/२, प्लॉट क्र. १३, सीटीएस क्र. ४८३९/६, प्लॉट क्र. १०, सीटीएस क्र. ४८३९३, शिव मंदिर रोड, गाव अंबरनाथ आता महसुल गाव कोहोज, खुंटवली, अंबनाथ पूर्व, जिल्हा- ४२१ ५०१ येथे स्थित. **श्री. उत्तमकुमार छोगालाल प्रजापती आणि तेजपाल छोगालाल प्रजापती यांच्या मालकीचे.**

सही/-
**दिनांक : ०६-०८-२०२६** **प्राधिकृत अधिकारी**
**ठिकाण : अंबरनाथ** **सारस्वत को-ऑप. बँक लि. करिता**